# कवयित्री इंदिरा संत : व्यक्तित्त्व आणि कवित्व

**Koti Santosh Vijaykumar**

Assistant Professor

**सारांश:**

पूर्वाश्रमीच्या इंदिरा गोपाळ दीक्षित या १९३६ साली इंदिरा नारायण संत झाल्या. पुढे त्यांची वाङ्मयीन कारकीर्द इंदिरा संत याच नावानी घडली. वडिलांच्या नोकरीनिमित्त त्यांचे वास्तव्य अनेक गावात झाले. जन्म (१९१४) विजापूर जिल्हयातील इंडी या गावी झाला. वयाच्या अवघ्या सातव्या वर्षी आकस्मिक वडिलांची छत्रछाया हरपली आणि दीक्षितांचे कुटुंब तवंदी या मूळगावी चुलत्यांकडे वास्तव्याला गेले. तवंदीच्या अनेक आठवणी लहानपणी वडिलांकडून ऐकलेल्या होत्या. जादूमयी दिव्यातील त्या गूढ तवंदीला नशिबाने नेले. इंदिबाईंच्या वडिलांची वृत्ती येथे रमत तिथेच त्यांचे काही वर्ष राहणे झाले. अनागर भागातील अकृत्रिम रसरशीत असे अनुभव त्यांना येत गेले. जीवनाची एक वेगळीच चाहूल त्यांना लागली.

**प्रस्तावना :**

पुढे त्या शिक्षणासाठी बेळगाव नंतर पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेज येथे गेल्या तेव्हा तवंदीच्या आठवणी त्यांच्या मनात फेर धरू लागल्या. त्यांच्या प्राणप्रिय वडिलांच्या स्मृतींही तवंदीमधल्याच होत्या. त्यामुळेच की काय इंदिराबाईंनी त्या जीवनावर कथालेखन केले. आज हे अज्ञान आहे. इतके त्यांचे कवयित्रीपण पुढे आले. तवंदीमधील निरागस जीवन, स्त्रीजीवन त्या कथांमधून त्यांनी प्रतिबिंबित केले आहे. 'श्यामली'(१९५२), 'कंदली'(१९५५), 'चैतू'(१९५७) हे इंदिराबाईंचे 'ई' कार व 'ऊ' कारयुक्त शीर्षकाचे कथासंग्रह आहेत. श्यामली, कदली, चैतू ही नावेही काव्यात्म आहेत. कर्नाटकात अशी काव्यात्मकता साध्या बोलण्यातही असते. त्या संस्काराची फुसटशी कल्पनाही त्या शीर्षकांवरून येते. कथेशिवाय ललितलेखनही इंदिराबाईंनी केले. 'मृद्गंध', 'मालनगाथा' हे त्यांचे ललितलेखसंग्रह आहेत. त्यांनी लोकगीतांचे संकलन आणि संपादनही केले आहे. परंतु त्या कवयित्री म्हणून वाचकप्रिय झाल्या. त्यांचे काव्य कसदार आहे, हेच या वरून स्पष्ट होते.

ईंदिराबाईंनी काव्यलेखनास १९३०-३१ साली प्रारंभ केला. 'शेला'(१९५१), 'मेंदी'(१९५५), 'मृगजळ' (१९५७), 'रगबावरी' (१९६४), 'बाहुल्या' (१९७१), 'गर्भरेशमी' (१९८२), 'चित्कळा'(१९८९) हे त्यांचे सुप्रसिध्द कवितासंग्रह आहेत. इंदिबाई अव्याहतपणे सहाएक दशके काव्यलेखन करीत होत्या. या प्रदीर्घ काव्यप्रवासात त्यांना अनेक मान-सन्मान व पुरस्कार लाभले. १९८३ साली 'गंर्भरेशमी' ला साहित्य अकादमीचा पुरस्कार तर 'जनस्थान' पुरस्काराच्याही मानकरी त्या ठरल्या.

इंदिराबाई शिक्षणासाठी फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे येथे गेल्या आणि 'समानशिले व्यसनेशू सख्यम्' या उक्ती प्रमाणे त्या नारायण संत त्यांच्या प्रेमात पडल्या. सर्वपरिस्थिती प्रतिकुल असतानाही १९३६ साली त्या संतांशी विवाहबध्द झाल्या. पतीपत्नीच्या कवितांचा १९४० साली त्या 'सहवास' हा संग्रह प्रकाशित झाला. त्यामध्ये इंदिराबाईंच्या ३६ कविता आहेत. प्रेम, प्रेमातील हुरहूर, ओढ, प्रतीक्षा, एकमेकांकडील प्रतिकुलतेमुळे की काय; पण त्यांमधून एकमेकांविषयी आवेग जाणवतो. हुरहूर आणि त्यापोटी आलेला रसडोळसणाचा अभाव त्यांकवितांमध्ये दिसून येतो; परंतु प्रतिमांतील उत्कट भावानुभूती ही 'सहवासची' जमेची बाजू आहे. खोलवर विचार करता त्यामागे त्यांचा स्वप्नाळूपणा आहे, हे ध्यानात येते.

इंदिराबाईंशी नियती क्रूर चेष्टा करीत होती. जेमतेम दहा वर्षांच्या होण्याआधीच वडिलांचे मृत्यू आणि वैवाहिक सौख्य केवळ दहा वर्षे लाभते न लाभते तोच पतीचा मृत्यू. ज्या पुरूषांवर भिस्त ठेवूनन निर्धास्त जगायचे असते त्यांनाच नियती हिरावून घेतली. 'सहवास' मधील 'अनाथ' कवितेमध्ये वडिलांच्या मृत्यूनंतरच्या अनाथपणाविषयी त्यांचे काव्यविधान आहे:

"पराधिन करून गेला लाडक्या जिवाला/नाही काय ओळखले हो घातकी जगाला/
वाटारून डोळे कोणी पाहता नमावे/ऊर भरून येता, कोठे जाऊन रडावे"

यानंतर अवघ्या चौदावर्षात पुन्हा आयुष्यात वनवास आला. साधेसे कारण होऊन नारायण संत १९४६ साली गेले. आयुष्याच गारठून गेल्याची भावना झाली. परिविरह, दु:ख या भावना त्यांच्या संवेदना बनून आल्या. दु:खविरहाच्या कुपीला त्यांनी सृजनाचा रंग नि गंध दिले. या एकाच विषयाला आपल्या भावविश्वामधील वैविध्य आणि वैचित्र रसिकाच्या प्रतितीस आणून दिले.

इंदिराबाई कविता करू लागल्या तेव्हा कुसुमाग्रज, बा. भ. बोरकर, अनिल; पु. शि. रेगे, बा. सी. मर्ढेकर, विंदा करंदीकर हे कवी स्थिरावलेले होते. इंदिराबाईंनी यांचे अनुकरण केले नाही! (त्या प्रभावित होत्या अनंत काणेकर वगैरेंवर !) त्यांना स्वत:ची वाट फारच लवकर मिळाली. 'शेला' संग्रह प्रकाशित झाल्या त्याची दखल वाङ्मयगुणामुळे घेतली गेली. मर्ढेकर ही इंदिराबाईच्या कवितेने प्रभावित झाले होते. श्री. पु. भावगंतांना लिहिलेल्या पत्रात (सत्यकथा:मे १९५६) मर्ढेकर, "सत्यकथेच्या अंकात (जुलै १९५३) इंदिराबाईंची आणि विंदा करंदीकरांची कविता माझ्या शेजारीच छापून आपण नि:शब्द पण अचूक टीका केली आहे. इंदिराबाईंच्या आणि विदांच्या कवितांनी माझ्या कवितेला खरोखरच लाजविले आहे. हया पुढे कविता लिहून नये असेच हया दोन कवितांनी मला प्रेमाचा सल्ला दिला आहे जणू... मर्ढेकरांची प्रवृत्तीशैली –ज्याला इंग्रजीत मर्ढेकरी idiom म्हणता येईल, अधिक सौंदर्याने मराठी कविता आता मिरवीत आहे. अहंकाराचा दोष पत्करून मर्ढेकर संपला : आता युग आहे आणि मर्ढेकरांपेक्षा किती तरी मनोज्ञ आहे ! हयात इंदिराबाई अथवा विंदाच्या स्वतंत्र प्रतिभेचा अनादर नाही... त्यांचे प्रतिभास्वातंत्र्य अनुपम आहे. म्हणूनच त्यांच्या कवितेने मराठी नवीन कवितेचे पाऊल माझ्या तुटपुंज्या रचनेच्या किती तरी पुढे जाईल अशी माझी अपेक्षा आहे" मर्ढेकरांचे हे विचार या दोघांबाबत खरे ठरले.

इंदिराबाईंची काव्यप्रवृत्ती पु. शि. रेगे यांच्या अत्यंत जवळची आहे. इतकी की समानशील वाटावे इतके एकत्व या दोहोंमध्ये वाटते. परंतु ते केवळ अनुभवविश्वाचे एकेरीपण याच अनुषंगाने बाकी वृत्ती आणि प्रवृत्तीत व्यस्तस्वभावधर्म आहे. रेगे देहस्वी, कामभाव आणि कामभावक्रीडेतील सौंदर्य ही रेग्यांची प्रेरणा. कामभाव ही मूलभूत दैहिकक्रीडा त्यांना जीवनऊर्जा वाटते. त्यातूनच त्यांची आत्मनिष्ठा आविष्कृत होते. अस्तित्वभावाचे ते त्यांना साधन वाटते. ही

आत्मनिष्ठा अविष्कृत होताना भुभुक्षित, व्यक्तिवाची व शारीरभावांची चाळवाचाळव करणारी नसते. स्त्री शरीर, संभोगभाव, शरीरातीत आळोखी आवेग, हे रेग्यांच्या कवितेत अत्यंत कातीव व आखीव होऊन उन्नतारस्थेला पोहोचते. अशी एककेंद्री व ृत्ती इंदिराबाईंचीसुध्दा आहे. ती रेग्यांसारखीच बंदिस्त होते. त्यांचा संवेदनस्वभाव बाहय विशाल अशा जगासाठी आपली दारे-कवाडे मिटून घेऊन आंतरिक रूदन सुरू केले. इंदिराजींचे सबंध काव्यविश्व एकसंध मनाच्याच 'मी' ने भरून राहिले आहे.

तुजविण आता तुझ्या या संसारी / अंगाराच्या सरी वर्षतात /
आतबाहेर लागलीसे आग / तुझ घेत माग येऊ कुठे ?

त्याच्या माग घेणे हीच इंदिराजींची काव्यप्रेरणा ठरली. रेगे देहाच्या कमानीमधून सौंदर्य घडवत नि:शारीर असे कामसौंदर्य दाखवतात तर इंदिराजींच्या काव्यात एक विदेही असते; ती मानस, अतृप्त असते. तिला प्रेमधाराची कितार अपेक्षित असते; ती शारीरभवाने पछाडलेली नसते. ती वैदेही मानसविश्वात डुंबलेली असते. ती नियतीच्या शृंखलेत करकचून जखडलेली होती. इंदिबाईंनी स्वत: म्हटले आहे की, "जे जे सोसले होते, अनुभवले होते, मनाला उसले होते ते ते आता उकळत होते. कळीतील सुगंधाप्रमाणे प्रत्येक अनुभव घटकात उतरलेल्या काव्यात्म घटकाला शब्दबध्द करण्याचा मला छंद जडला." इंदिराबाईंच्या या विधानातून अनेक गोष्टी सूचकतेने आल्या आहेत. कौटुंबिक अनेक आपत्ती त्यांच्यावर धडाधडा कोसळत राहिल्या. वडिलांचा मृत्यू, त्यामुळे कांकांकडे आश्रय, काकांची कडक शिस्त, तारूण्याच्या उंबरठ्यात संसार बहरत असताना पतीचा मृत्यू, तीन मुलांचे एकट्याने संगोपन आणि भरीस भर पूर्वीपासूनच एकाकीपणाला कवटाळण्याचा स्वभाव यांमुळे त्यांचा संवेदनस्वभाव पालवला गेलाच नाही. उलट अंतर्मुखतेची पीळ घट्ट झाली. "मन कराया मोकळे / कसा पिसारा खुडावा / जीवे भावे पाळलेला / मोर कोठे उतरावा ?" असा तिढयाचा प्रश्न बाईंच्या समोर होता.

त्यांची प्रीती, विरह, एकीपणाचे दु:ख आणि भावनांचा कल्लोळ निसर्गप्रतिमांतून भावोत्कटतेने नेमकया शब्दांत व्यक्त केले आहे. निसर्ग त्यांच्या कवितेत भिजलेला वाटतो. अचूक प्रतिमा हेरून निसर्ग घटकाला आपल्या कवितेच्या अविभाज्य घटक केले आहे. इंडी, तवंदी, बेळगाव, फर्गसन कॉलेजच्या मस्तकीची टेकडी या ठिकाणांचा निसर्ग त्यांच्या कविता कवितामध्ये त्यांना ल्हादवतो. कवितेचा एक अंगभूत घटक बनून मनाला तोषवितो.

"चिंव पाणथळ; शिथिळ माळ हा / मान टाकूनी पडला तापत; / काळीपिवळी फुलाखरे / ओल्या गवतावरती उडवित / माळावरल्या पालामधली / रंगीत वाकळ, तशी जुनेरी, / विसरून बघती रंग आपुले / उन्हात हिरव्या आणि रूपेरी"

असा निसर्ग, त्याचा अवकाश, त्यामधील सजीव-निर्जीवसृष्टी एका लयीत त्या उभे करतात.

इंदिराबाईंच्या कवितेतील लयात्मकता मोहमयी आहे. त्याचे कारण त्यांची लोभस आणि सुकुमार अशी भावकाव्यानुकूल शब्दकळा होय. या सुदंर लययुक्त लोभस शब्दकळेसह बाईंनी सुरूवातीला लोकगीतानुकूल अशी रचना केली आहे. तवंदीमधील संस्कार असतील ते ओवीगीते सूर्योदयाबरोबर कानावर येत असतील. त्या संस्कारातून ओवी-अभंग अशास्वरूपांची रचना 'सहवास' मध्ये झाली आहे. पण नंतर नाही. दरएका कवितासंग्रहानंतर इंदिराबाईंची त्याच त्या संवेदनस्वभावाची कविता प्रगल्भ होत गेलेली दिसून येते.

इंदिराबाईंचा संवेदनस्वभाव अत्यंत तरल असा आहे. त्यांचे सारे अनुभवविश्व भूतकाळात अवगुंटीत होऊन वर्तमानात 'मी' आणि 'तू' च्या रूपांत अभिव्यक्त होते. पतीनिधनही परमावलीची दु:खद घटना कवितेतून प्रतिबिंबित होत नाही. ती दु:खद भावना गाढ स्नेहार्द्र; परंतु विरह व्याकूळ रूपांत प्रकटते. कौटुबिंक दु:ख मोडून पडलेल्या संसाराची चौकट इंदिराबाईंच्या काव्यविश्वात दिसत नाही. ही त्यांची थोरवी म्हटली पाहिजे. पाय मोडून न बसता त्याला आठवत, त्याच्या स्मृतींचा रिमझिम पाऊस मनात वर्षवत त्या 'मनुष्यत्वाचा पुरूषार्थ' सिध्द करतात. अंतर्मुख होऊन, भावविव्हल होऊन कोसळून पडता आत्मनिष्ठेते, आत्मनिमग्न काव्यवाट चालतात. पतीनिधना मुळे भूतकालीन भावविश्वात स्वत:चा विलय करून कवितेत ते 'प्रेयसी' आणि 'प्रियकर' या असीम, निर्मळ, नितळ नात्याला त्या लोभस शब्दांत व्यक्त करतात. पतीवरची निष्ठा तोच आहे असे मानण्याची श्रध्दा या गोष्टी उच्चतर अशा आहेत. एकत्रकुटुंब आणि जन्मोजन्मी हाच पती लाभो ही प्रार्थना वास्तवात साक्षात केली. पतीपत्नी नात्यातील प्रेमाऐक्याची अत्यंत दुर्मिळ घटना इंदिराबाईंच्या जीवनात आणि काव्यात दिसते. ही उच्चकोटीतील मानवीयता आणि जीवशिवैक्यभाव म्हटले पाहिजे. ही गोष्ट मोडून पडू पाहणाऱ्या कुटुंबमूल्यांची पायमल्ली करू पाहणाऱ्या काळातील समाजमनाला अत्यंत पोषक आहे.

इंदिराबाईंचे व्यक्तिगत खाजगी जीवन कवितेत येऊनही त्याला त्या विशुध्द, निर्मळ अशा रूपात आविष्कृत करतात. हा अभिजाततेचाच वाण म्हणायला पाहिजे. कारण त्या अभिव्यक्तीत संयम आणि प्रसाद हे विशेष आहेत. इंदिराबाई म्हणतात, "माझी कविता माझ्या भावनात्मक आयुष्याशी निगडीत आहे. पण ती माझी सखी नव्हे किंवा माझी प्रतिकृती नव्हे. . . . . जीवनातील संघर्षात व्यक्तिमत्त्वाच्या ज्या ठिणग्या उठतात. . . त्या ठिणग्यांनी घेतलेला आकृतिबंध म्हणजे माझी कविता" म्हणून इंदिराबाई संत यांची कविता थोर ठरली. त्या साहित्य संमेलानाक्ष होऊ शकल्या नाहीत याचे वाईट वाटते.

**संदर्भ:**

१. बा.सी. मर्ढेकर,: सत्यकथा, मे १९५६



**Koti Santosh Vijaykumar**
Assistant Professor